**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १६/२०२४</u>**
**<u>निशाणी क्र</u>. १०**
**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १</u>**

**नाव - सागर उदयसिंग पवार**

**वय - ३४**

**धंदा - शेती**

**राहणार - नांदवळ, ता. कोरेगांव, जि. सातारा.**

**<u>अभियोगपक्षातर्फे शपथेवर सरतपास विधीज्ञ श्री. व्ही. एस. कोकाटे यांच्यामार्फत सुरु</u>**

सदरचा अपघात १०/०५/२०२३ रोजी खरेदी चौकात करंजकोप नांदवळ रोड येथे रात्री १०.४५ च्या सुमारास झाला होता. मी करंजकोपकडून नांदवळकडे माझी मोटारसायकल सी. डी. डिलक्स एम. एच. ११ सी. डी. ८१४७ ने निघालो होतो. माझ्या मोटारसायकलवर मी, चंद्रकांत बोडरे, दत्तात्रय सुरेश मदने असे निघालो होतो. मोटारसायकल दत्तात्रय चालवित होता. मी मोटारसायकलवर तिस-या क्रमांकावर बसलो होतो. त्यावेळी समोरुन ट्रॅक्टर आला त्याला उजव्या बाजूची लाईट नव्हती. त्यामुळे समोरासमोर धडक झाली. आम्ही खाली पडलो. चंद्रकांत व माझा उजवा पाय फ्रॅक्चर झाला होता व दत्तात्रय यास मुका मार व किरकोळ दुखापत झाली. घटनास्थळावरुन आम्ही आमचा मित्र हेमंत ठोंबरे व कल्पेश पवार यांना फोन केला. त्यांनी घटनास्थळी येवून चारचाकी वाहन बोलावून घेतले व वाई येथील पाटील हॉस्पिटल येथे उपचारकरीता नेले.

ट्रॅक्टर संदीप पवार चालवित होते. आरोपी हे माझ्या गावातील असल्याने माझ्या ओळखीचा आहे. आरोपीचा ट्रॅक्टर massan furgusan कंपनीचा लाल रंगाचा होता. ट्रॅक्टरला नंबर प्लेट नव्हती. पोलीसांनी आमच्याकडे घटनेच्या दुस-या दिवशी वाई हॉस्पिटलमध्ये चौकशी केली होती व माझा जबाब नोंदविला होता. आता मला जबाब दाखविण्यात आलेला जबाब माझा आहे त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी ११</u>** देण्यात येते. त्यानंतर डॉक्टरांनी मला उपचाराकरीता दाखल करून घेतले व पायामध्ये रॉड टाकणेत आला. त्यानंतर पोलीस स्टेशनमध्ये दिनांक १४/०६/२०२३ रोजी फिर्याद दाखल केली. आता मला दाखविलेला फिर्यादी जबाब तोच आहे. त्यावर माझी सही असून मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी १२</u>** देण्यात येते.

आता मला दाखविलेला प्रथम खबरी अहवाल तोच आहे. त्यावर माझी सही असून मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी १३</u>** देण्यात येते.

घटनास्थळ मी पोलीसांना दाखविले होते. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**अभियोग पक्षातर्फे सरतपास पुर्ण**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. के. सी. खराडे यांच्यामार्फत सुरु.</u>**

करंजकोप–नांदवळ रस्ता सहा ते सात फूट रुंदीचा आहे. आम्ही तिघे कल्पेश याची मोटारसायकल चालू करण्यासाठी गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ११ चा जबाब देतेवेळी **"आम्हास धडकलेला ट्रॅक्टर तेथून लगेच निघून गेला त्यामुळे आम्ही कोणीही त्याचा नंबर पाहू शकलो नाही तसेच त्यातील चालकाचे आम्हाला माहिती नाही"** असे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, कथित घटनेच्या वेळी अंधारामुळे ट्रॅक्टर कोणता होता, कोण चालवित होते व क्रमांक माहिती नसल्यामुळे निशाणी क्र. ११ च्या जबाबामध्ये तसे सांगितले होते. मी वाई येथील दवाखान्यात बारा दिवस दाखल होतो. त्यानंतर मला सोडण्यात आले. माझे मित्र फोन केल्यानंतर घटनास्थळावर १० मिनिटात आले. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीस ट्रॅक्टर चालवित असताना मी समोरासमोर पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझा व दत्तात्रय चा पाय फ्रॅक्चर झाला होता त्याची नुकसान भरपाई मिळणेकरीता सदरचा खोटा गुन्हा आरोपीविरुद्ध उशीराने दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी कथित घटनेवेळी सदरचा ट्रॅक्टर चालवित होता हे मी खोटे सांगत आहे. मी संदीपला म्हणजेच आरोपीला फक्त गाववाला आहे म्हणून न्यायालयात ओळखतो.

**न्यायालयामार्फत भारतीय पुरावा कायदा कलम १६५ अन्वये प्रश्न**

१. तुम्ही फक्त गाववाला आहे म्हणूनच आरोपीस न्यायालयात ओळखले का ?

उत्तर – नाही.

**फेरतपास नाही.**

**उलटतपास पुर्ण.** **श्रवणोत्तर स्वीकृती**

**कोरेगांव** **(सी. एस. पाटील)**

**दिनांक - २७/११/२०२५** **प्रथम** वर्ग **न्यायादंडाधिकारी, कोरेगांव.**